# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 03/09/2022 (शनिवार)

---

## पोलिस स्टेशन देवलापार हददीत मौजा पवनी येथे आदिवासी विकास योजने अंतर्गत आलेल्या शेगडयांची चोरी

सन २००६ मध्ये महाराष्ट्र शासनसतर्फे अनुसूचीत जमातीसाठी विकासासाठी राज्य सरकारी योजनेतून अनुसूचीत जमातीच्या कुटुबांना घरगुती गॅस युनिट पुरवण्याची योजना अंर्तगत गॅसच्या शेगडया पवनी येथील धान खरेदी केंद्रातील कार्यालयातच ठेवल्या होत्या. दि. २०/०८/२०२२ रोजी फिर्यादी नामे— सुभाष नारायणराव मडावी वय ४८ वर्ष रा देवलापार याने नेहमी प्रमाणे पवनी येथील धान खरेदी केंद्राचे कार्यालयात जावुन कार्यालयाचे कुलुप उघडुन पाहिले असता सर्व व्यवस्थित दिसले. त्यानंतर ते दि. ०१/०९/२०२२ रोजी नेहमीप्रमाणे सकाळी १०.०० वा पवनी येथील धान खरेदी केंद्राचे कार्यालयात आत जावुन पाहिले असता गॅस शेगडया अस्तव्यस्त पडलेल्या दिसल्यास मागील खिडकी ही तुटलेली दिसली. त्यावरून फिर्यादीने गॅसच्या शेगडया मोजुन पाहिले असता एकुण ३८८ गॅसच्या शेगडया पैकी ६५ गॅसच्या शेगडया दिसल्या नाहीत व १० इलेक्ट्रीक वनज कटयापैकी ०४ वनज काटे प्रत्येकी कि. ५०० रू. असा एकुण कि. ३४,५००/—रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

अशा फिर्यादीचे रिपोर्ट वरून पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द अप क्र. १८६/२०२२ कलम ४५७, ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हा नोंद होताच तात्काळ मा. ठाणेदार देवलापार यांचे आदेशाने पोउपनि लक्ष्मी घोडके पोशि गजानन जाधव चापोहवा गजानन कविराजवार यांचे तात्काळ तपास पथक नेमुण सदर गुन्हयातील आरोपीचा शोध घेण्यात आला असता सदर गुन्हयामध्ये आरोपी नामे— सुरेश रोशनलाल पटले, वय ३६ वर्ष, रा.सितापुर यास अटक करण्यात आली असुन आरोपीचा दि. ०३/०९/२०२२ रोजी पावेतो पीसीआर घेण्यात आला आहे. आरोपीच्या ताब्यातुन एकुण ३७ गॅस शेगडया हस्तगत करण्यात आल्या आहेत. तसेच सदर गुन्हयातील इतर आरोपीचा शोध घेणे सुरू आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री विजयकुमार मगर, पोलीस अधिक्षक नागपूर ग्रा., मा.श्री राहुल माकणीकर अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रा.,मा. श्री मुख्तार बागवान उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रामटेक यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि प्रवीण बोरकुटे यांच्या नेतृत्वात पोउपनि लक्ष्मी घोडके, पोशि गजानन जाधव, चापोहवा गजानन कविराजवार व गायकवाड यांनी केली आहे. पुढील तपास पोउपनि पुंजरवाड हे करीत आहेत.



## दरोडा

**पो.स्टे. कोंढाळी** :— अंतर्गत ०८ मी अंतरावर मौजा कुंडी शिवार येथे दिनांक ०२/०९/२०२२ चे १६.१५ वा. ते १७.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— नुरजहॉ मणी शेट्टी वय ४८ वर्श रा.खांडी चापडा ता.शहापुर जि.ठाणे हे आपला ड्रायव्हर राजबहादुर वर्मा याचे सह मौजा कुंडी गावाचे रोडनी शेती विकत घेण्याकरीता त्यांचे ओळखीचे आरोपी १) रमेश चव्हाण रा.नागपूर व इतर अनोळखी ६ इसम बोलावीले वरुन तेथे आले असता व नमुद आरोपी नामे रमेश चव्हान याचे सोबत बोलचाल करित असता नमुद आरोपी यांचे ६ साथीदार अंदाजे ३० ते ४० वयोगटातील ३ मो.सा. नी आले व फिर्यादी व तिचे ड्रायव्हरला फायबर लाठीने मारहाण करून चाकुचा धाक दाखवुन फिर्यादीने ड्रायव्हर जवळ ठेवलेले नगदी ५००/—रू चे ४ बंडल प्रत्येकी बंडल मध्ये १०० नोटा असलेले एकुण २,००,०००/—रू हिसकावुन आपल्या मोटरसायकलने पळुन गेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीतांविरुध्द कलम ३९५ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पंकज वाघोडे, सपोनि/ठाणेदार मो.नं ७३०४२१०७२४ हे करीत आहे.

## चोरी

**१) पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील मौजा पॅनॉसोनीक सोलुशन इंडीया प्रायव्हेट लि गोडावुन गोंडखैरी येथे दिनांक २९/०८/२०२२ चे २१.४५ वा. ते ३०/०८/२०२२ चे ०९.२० वा. सुमारास अज्ञात आरोपीने फिर्यादी नामे— हरिश शिवराज डोरले, वय ३६ वर्ष, रा. म्हाडा कॉलनी कॉलनी नं ११, नवनीत नडार वाडी नागपुर यांचे गोडावुनच्या मागील टीनाचे स्क्रु काढुन आत प्रवेश केला. यानंतर आरोपीने गोडावुनमधील डेल कंपनीचे दोन नग सीपीयु तसेच कार्टन मध्ये पॅक बंद असलेले डेल कंपनीचे दोन नवीन सीपीयु असे एकुण ४ सीपीयु किमती ३०,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास श्रेणी पोउपनि नागपुरे हे करीत आहे.

**२) पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील ओबाळा टर्निंग रामटेक येथे दिनांक ०१/०९/२०२२ चे १८.०० वा. ते ०२/०९/२०२२ चे ०६.०० वा. सुमारास शासकिय बांधकामाचे १०एम.एम.असलेले ८ लोखंडी बंडल कि. ३०,०००/—रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— शैलेश शंकर पालांदुरकर वय ३१ वर्ष, रा.घोटीटोक यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक योगोश भुरे मो.क्र.७७२२००३६७३ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील तारसा शिवार महेश पेट्रोलपंप समोर येथे दिनांक ०२/०९/२२ चे ०७.२२ वा. सुमारास फिर्यादी नामे— श्रीधर राजेराम वाघमारे वय ४८ वर्ष, रा. नागपुर हे आपल्या पुतन्याला घेउन त्यांची एमएच—४०/एसी—२८१३ क्रमांकाच्या मोटरसायकलनी तारसा येथे जात असतांना एमएच—४९/बीसी—३६९१ क्रमांकाच्या बजाज मेक्सीमा तीन चाकी गाडीचा चालक आरोपीने फिर्यादीच्या गाडीला जोरदार धडक दिली. या अपघातात फिर्यादीचा पुतन्यया नामे— निखिल प्रमोद गजभिये(मृतक) वय १८ वर्ष, रा. गांगनेर मौदा याच्या डोक्याला मार लागला व डोक्यातुन रक्त निघाला व बेशुद्ध झाला. तेव्हा फिर्यादीने पुतन्याला तारसा पीएसी येथे नेले असता तेथिल डॉक्टरांनी त्याला उपजिल्हा रुग्णालय मौदा येथे रेफर केले व फिर्यादीने पुतन्याला घेउन उपजिल्हा रुग्णालय मौदा येथे नेले असला तेथिल डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

सदर प्रकरणी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ अ भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक बिरोले मो.क्र ९४०३७०१२६३ हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. नरखेड —** दिनांक ०२/०९/२०२२ चे ०६.०० वा. सुमारास पो.स्टे. नरखेड हद्दीत फिर्यादीची मुलगी वय १७ वर्ष फिर्यादी ही झोपेतुन उठली असता त्यांची मुलगी वय १७ वर्ष ही घरात दिसुन आली नाही. तिचा आजुबाजुला नातेवाईकांकडे मैत्रीणींकडे विचारपुस केली असता मिळुन आली नाही. तिला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री बोथले हे करीत आहे.

## फसवणुक

**पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत ०२ कि मी अंतरावरील मौजा चनकापुर येथे दिनांक २९/०८/२०२२ चे १५.३० वा. ते १६.०० दरम्यान फिर्यादी नामे— राजेशकुमार दवारीकाप्रसाद अवधिया वय ४६ वर्ष, रा. चनकापुर क्वार्टर नं सी १ सावनेर धंदा नौकरी— वेकोली खदान नं ०३ यांचे फोनवर अज्ञात आरोपीने मॅसेज करून 'आपकी बिजली बंद

होनेवाली है, आपका पिछले महीने का बिल अपडेट न होन की वजह से बंद कर दिया गया' असे मॅसेज पाठवुन फिर्यादीस विजबिल अपडेट करण्याकरीता इलेक्ट्रीकसीटी बिल क्वीक ॲप डाउनलोड करण्यास सांगुन व त्यास लिंक पाठवुन त्याच्या एस.बी.आय व देना बॅकेचा खात्यातुन एकुण १,६८,२०४/–रू. काढुन घेत फिर्यादीची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. सहकलम ६६ ड माहिती तंत्रज्ञान अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री प्रविण मुडे मो नं. ९९७००९४७०९ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. बेला** :– अंतर्गत वार्ड क्र. ५ बेला ता. उमरेड जि. नागपूर येथे दिनांक ०४/०१/२२ चे १२.०१ वा. सुमारास आरोपी नामे– अमोल प्रेमराज विरूचकर रा. वार्ड नं. ५ बेला याने फेसबुक या शोशल मिडीयावर अल्पवयीन मुलाचा लैंगीक कृत्य करतांना चा विडीओ प्रसिद्ध केल्याने त्या अन्वये महाराष्ट्र सायबर कडुन पोनोग्राफी टिपलाइन क्र. ८४१२३७५५ क्र. अन्वये अल्पवयीन मुलाचा एक पोर्न विडीओ फेसबुक या मिडीयाच्या माध्यमातुन प्रसिद्ध केला त्यामुळे सदर आरोपी वर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोउपनी निशांत जुनोकर नेमणुक सायबर सेल नागपुर ग्रामीण यांचे रिपोर्ट वरुन पो. स्टे. बेला येथे आरोपी चालकाविरुध्द कलम ६७(अ) ३७(ब) माहिती तंत्रज्ञात कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे.

**३) पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :– अंतर्गत ०४ कि.मी. अंतरावरील टाकळघाट येथे दिनांक ०२/०९/२२ चे १७.३० वा. ते १८.०० वा. सुमारास फिर्यादी वय ३६ वर्ष हिने फेसबुक वर ग्लोरी लोन ॲप जाहीरातीवर लोन साठी डाउनलोड केले. त्यानंतर आरोपीने फिर्यादीकडून सर्व माहीती घेवून फिर्यादीस म्हटले की, आमचे लोन चे पैसे पेड करा नाहीतर तुमचे अश्लील व्हिडीयो व फोटो इंटरनेटवर अपलोड करील. अशी धमकी दिली व अश्लील व्हीडीओ बनवून फिर्यादीचे कन्डक्ट नंबरवर पाठविले व पुन्हा पाठविण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ६६(ड) ६७ माहिती तंत्रज्ञात कायदा सहकलम ५०७ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोनि अशोक कोळी मो.क्र. ७८६८८७२७८६ हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

**१) पो.स्टे. सावनेर :–** अंतर्गत ०१ कि.मी अंतरावरील राहते घरी लक्ष्मीनगर भूतळा ले आउट सावनेर येथे दिनांक ०१/०९/२०२२ चे २०:३० वा. दरम्यान **सौ. संगिता संजय रक्षे (मृतक), वय ५१ वर्ष, रा. लक्ष्मी नगर भूतळा ले आउट सावनेर** हिचे तिच्या पती सोबत नेहमी घरगुती कारणावरुन वादविवाद व झगडा भांडन होत होते याच कारणावरुन यातील मृतक हिने स्वताचे राहते घरातील मागच्या रुम मध्ये असलेल्या सिलींग फॅन साडीने गळफास घेतल्यानंतर ती मृत अवस्थेत आढळून आली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– मनोज संजय रक्षे वय ३२ वर्ष रा. लक्ष्मीनगर भूतळा ले आउट सावनेर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. सावनेर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार राजेन्द्र यादव ९४२३६०२९८७ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. केळवद :–** अंतर्गत ०४ कि.मी अंतरावरील मौजा रामपुरी येथे दिनांक ०२/०९/२०२२ चे १४:०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुरेश बाळाजी डबले वय ५७ वर्ष रा. रामपुरी त. सावनेर ह.मु कळमेश्वर वार्ड क्र ११ हे

कळमेश्वर येथुन रामपुरी येथे शेतात जाण्यासाठी घरी गेले असता त्यांना गावातील लोकांकडुने माहीत पडले की, त्यांची चुलत बहीण नामे– सरस्वताबाई भोयर हिचे घरी पोलीस आले आहे. त्यावरून त्यांनी चुलत बहीणीचे घरी जावुन पाहीले असता त्यांचा भाचा नामे– **प्रविण प्रेमराज भोयर(मृतक), वय २९ वर्ष, रा. रामपुरी** हा दारू पिण्याच्या सवयीचा असल्याने त्याने दारूच्या नशेत घरी एकटाच असतांना घरातील आड्याला दुप्पटा व दोरीने स्वता: गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. केळवद येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार सुभाश राठोड मो.न. ९८२३०७४७४२ हे करीत आहे.

पोउपनि श्री भारत थिटे
मो.क्र. ७८८८०१६९४५
पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर